कार्यालय परिपत्रक क्र. २३

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
वाहतुक व्यवस्थापक कार्यालय
दिनांक : -२३/०५/२०२०

**विषयः-पिंपरी-चिंचवड शहर व एमआयडीसी परिसरातील नियोजित बस मार्गावरील काही बसेस सुरू करणेबाबत.**

संदर्भः-मा.आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांचे दालनात झालेल्या दिनांक २१/०५/२०२० रोजीच्या बैठकीनुसार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे आदेश

वाहतूक विभागाकडील विशेषतः पिंपरी चिचंवड शहरातील निगडी, भोसरी व पिंपरी आगाराकडील सर्व चालक-वाहक,गॅरेज सुपरवायझर तसेच आगार व्यवस्थापक यांना कळविण्यात येते कि, मा.आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांचे दालनात झालेल्या दिनांक २१/०५/२०२० रोजीच्या बैठकीतील आदेशानुसार पिंपरी-चिंचवड शहर व एमआयडीसी परिसरातील नियोजित मार्गावरील काही बसेस सुरू करणेबाबत निर्देश करण्यात आलेले असून मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी दिलेल्या सुचनेनुसार बंद करण्यात आलेले निगडी व भोसरी डेपो पुर्ववत सुरू करण्यात येऊन पिंपरी-चिंचवड व एमआयडीसी परिसरातील बस मार्गावरील काही बसेस सुरू करण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने सोबत दिलेल्या तक्त्याप्रमाणे नियोजन करण्यात आले आहे.

तरी संबंधितांनी वरील सुचनेचे काटेकोरपणे पालन करून सोबत दिलेल्या तक्त्यानुसार मार्गावरील बसेसचे संचलन करावे. सदर मार्गांवर फक्त पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या मालकीच्या बसेस (खाजगी बसेस नेमण्यात येऊ नयेत) नेमण्यात येत असून संबंधित आगार व्यवस्थापक यांनी नेमुन दिलेल्या मार्गावर वारंवारीतेनुसार शेडयुल सुरू करणेबाबतची कार्यवाही दिनांक २६/०५/२०२० पासुन करण्यात यावे व तसेच मुख्यालय क्र २ यांनी संचलन सुरू करणेत आलेल्या स्थानकांवर कंट्रोलर कम चेकर सेवकांची नेमणुक करावी.

वाहतुक व्यवस्थापक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

**प्रती:-आगार व्यवस्थापक निगडी, भोसरी व पिंपरी डेपो**
**सि.टा.कि., टा.कि. गॅरेज सुपरवायझर,**
**स्थानक प्रमुख, कंट्रोलर, ई-तिकीट विभाग,**
**तक्रार निवारण कक्ष, इन्फोनियम कंपनी,** सुरक्षा विभाग
**एनईसी, पास विभाग, मुख्यालय क्र.१ व २, नोटीस बोर्ड**

**प्रतः- मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक** यांजकडेस माहितीसाठी सविनय सादर

**सोबतः- बस संचलनाबाबत घ्यावयाची दक्षता**

E:\Vinod_2020\Tms\Letter_tms_20.docx



Scanned by CamScanner

## आगार व्यवस्थापक, आगार अंभियंता, कंट्रोलर कम चेकर, चालक व वाहक यांनी बस संचलनाबाबत घ्यावयाची दक्षता

१. मार्गावर कामगिरीस असतांना तुर्त बस मध्ये २१ प्रवाशांस मुभा देण्यात यावी.

२. चालक-वाहक यांनी प्रवाशांना सुरक्षित अंतर ठेवणे व मास्क लावणेबाबत मार्गदर्शन करावे व मास्क असलेल्या प्रवाशांनाच बसमध्ये प्रवेश देण्यात यावा.

३. १० वर्षाखालील व ६५ वर्षावरील प्रवाशांना बसमध्ये प्रवेश देण्यात येऊ नये.

४. मार्गावर पाठविण्यात येणाऱ्या बसेस दैनंदिन स्वच्छ व सॅनिटायझिंग करून पाठविणे आवश्यक आहे.

५. डेपोव्यतिरिक्त बस स्थानकावर सॅनिटायझिंग टिमची नेमणुक करून बसेसची स्वच्छता करावी.

६. कंट्रोलर कम चेकर यांनी बसमध्ये २१ प्रवासी संख्या मर्यादेचे पालन होत असलेबाबत खात्री करावी.

७. चालक व वाहक यांनी नेमुन दिलेल्या खेपांच्या वेळाचे काटेकोरपणे पालन करून नियोजीत खेपा पुर्ण कराव्यात.

८. कंट्रोलर कम चेकर यांनी बस स्थानकावर गर्दी होणार नाही याबाबत दक्षता घेऊन सोशल डिस्टसिंगचे पालन करावे.

23/5

**वाहतूक व्यवस्थापक**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**



Scanned by CamScanner

## पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

## तुर्त पिंपरी-चिंचवड शहर व एमआयडीसी परिसरातील नियोजित बस मार्गावरील काही बसेस सुरू करणेबाबतचा तक्ता

| अ. क्र. | मार्ग क्र. | पासून | पर्यंत | अंतर | नियोजित शेडयुल | सद्या धावयाचे शेडयल | डेपो |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३०५ | निगडी | वडगांव/नवलाख उंबरे | २२.०० | ९ | ४ | निगडी |
| २ | ३०६ | डांगे चौक | हिंजवडी माण-फेज-३ | ११.८५ | ६ | ३ | निगडी |
| ३ | ३३० | आकुर्डी रेल्वे स्टेशन | चिखली | ७.५० | १ | १ | निगडी |
| ४ | ३४० | निगडी | चऱ्होलीगांव/आळंदी | ११.८० | १ | १ | निगडी |
| ५ | ३४३ | वडगांव मावळ | चाकण, आंबेठाण चौक | २१.४० | ३ | २ | निगडी |
| ६ | ३५० | निगडी | देहूगांव | ८.८० | ७ | ४ | निगडी |
| ७ | ३६७ | निगडी | भोसरी | १०.८० | ४ | २ | निगडी |
| ८ | ३६८ | निगडी | कामशेत | ३१.८० | २ | १ | निगडी |
| ९ | ३६९ | निगडी | चाकण/वासोली | २०.५० | २ | १ | निगडी |
| १० | ३७२ | निगडी | हिंजवडी माण-फेज-३ | १९.३५ | १२ | ६ | निगडी |
| ११ | ३८१ | चिखली | हिंजवडी माण-फेज-३ | २२.९५ | १० | ४ | निगडी |
| | | | | एकुण | ५७ | २९ | |
| १ | ३०९ | आंळदी | देहूगांव | १६.०० | ७ | ४ | भोसरी |
| २ | ३२४ बी.आर.टी. | भोसरी | हिंजवडी माण-फेज-३ | २३.८५ | ९ | ५ | भोसरी |
| ३ | ३४५ बी.आर.टी. | भोसरी | हिंजवडी माण-फेज-३ | २२.५५ | ६ | ३ | भोसरी |
| ४ | ३५१ | आळंदी | जांबे | ३१.१० | १ | १ | भोसरी |
| ५ | ३५८ | भोसरी | राजगुरूनगर | २८.४० | १८ | ८ | भोसरी |
| ६ | ३५८ | भोसरी | चाकण, आंबेठाण चौक | १६.७० | ५ | २ | भोसरी |
| ७ | ३६१ | भोसरी | आळंदी | ८.५० | ६ | ३ | भोसरी |
| | | | | एकुण | ५२ | २६ | |
| १ | १२० | भोसरी | म्हाळुंगे, एमआयडीसी | २३.४० | ३ | २ | पिंपरी |
| २ | ३०२ | पिंपरीगांव | भोसरी | ८.६५ | ४ | २ | पिंपरी |
| ३ | ३०४ | चिंचवडगांव | भोसरी | १०.२० | १० | ५ | पिंपरी |
| ४ | ३२६ | पिंपरीगांव | चिखली | १२.१० | ४ | २ | पिंपरी |
| ५ | ३२७ | हिंजवडी माण-फेज-३ | आळंदी | ३४.०५ | ४ | २ | पिंपरी |
| ६ | ३३१ | चऱ्होलीगांव | रहाटणीगांव मार्गे चऱ्होलीफाटा | २२.०० | २ | १ | पिंपरी |
| ७ | ३३१ | भोसरी | रहाटणीगांव | १३.०० | ७ | ३ | पिंपरी |
| ८ | ३३५ | डांगे चौक | जांबे/नेरे दत्तवाडी | १५.६० | २ | १ | पिंपरी |
| ९ | ३५५ | चिखली | डांगे चौक | १३.०० | ६ | ३ | पिंपरी |
| १० | ३६२ | वायसीएम हॉस्पिटल | आळंदी | १४.०० | १ | १ | पिंपरी |
| ११ | ३८० | भोसरी | हिंजवडी माण-फेज-३ | २४.४० | २ | १ | पिंपरी |
| १२ | ३१३ | चिंचवडगांव | चांदखेड | १९.३० | ४ | २ | पिंपरी |
| | | | | एकुण | ४१ | २५ | |



E:\Vinod_2020\Tmo\Pcmc_Covid-19

Scanned by CamScanner